**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ७८/२००७

सरकार –वि– रमेश गोतमारे

नि.क्र.११

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – उमेश विजयकुमार शहा,

वय – ६३ वर्षे, व्यवसाय – भांड्याचे दुकान,

राहणार — बाळापुर, ता. बाळापुर, जिल्हा – अकोला.

**<u>सरतपासणी सरकारतर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. सन २००७ मध्ये माझा भांड्याच्या दुकानाचा व्यवसाय होता. माझ्या दुकानाची वेळ सकाळी १०.०० वाजतापासून ते रात्री ०८.०० वाजेपर्यंतची होती. दि.०८.०५.२००७ रोजी काय घटना घडली होती हे आता मला आठवत नाही. त्या दिवशी माझ्या दुकानात कोण आले होते हे आता मला आठवत नाही. घटनेबाबत मला काही माहिती नाही.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरुन उलट तपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे</u>. <u>उलट तपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांच्यामार्फत</u> :–**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८.०५.२००७ रोजी मी माझ्या भांड्याच्या दुकानात हजर असतांना एक अनोळखी इसम माझ्या दुकानात एक जर्मनचा डब्बा व तांब्याचा लोटा विक्रीसाठी घेवून आला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या अनोळखी इसमाला भांडे कशासाठी आणले याबाबत विचारणा केली असता माझी पत्नी आजारी आहे व हे भांडे घेवून मला पैसे द्या असे रडत रडत त्या इसमाने मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, लग्नसराई असल्यामुळे त्या दिवशी माझ्या दुकानात भरपुर गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही वस्तुचे वजन करुन मी त्याला रोख रक्कम १३५/– रुपये दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, तो इसम निघून गेल्यानंतर त्या इसमाने भांडे चोरुन आणल्याचे मला कळले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या भांड्याची चिठ्ठी मी त्या इसमाला दिली होती. आता मला एक चिठ्ठीची मुळप्रत दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर आरोपीची सही आहे व एक साक्षीदार म्हणून रवी चावरे यांची सही आहे. ती चिठ्ठी माझ्याच दुकानाची असून त्यावर विजय विठ्ठलदास शहा असे नमुद केलेले आहे. त्याला **<u>नि.क्र.१२</u>** देण्यात येते. त्या अनोळखी

इसमाने आणलेल्या भांड्याच्या मालकीबाबत मी शहानिशा केली होती. मी भांड्याचे बिल बघितले नव्हते. आरोपी रमेश गोतमारे याला मी बघितले तर ओळखु शकतो.

**<u>सरतपास संपला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०४.२०२६ | दि.२३.०४.२०२६ |

**फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा**

नि.फौ.ख.क्र. ७८/२००७

सरकार –वि– रमेश गोतमारे

नि.क्र.१३

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — अरुण अंबादास पुरकर,

वय – ६७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार,

राहणार — शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकारतर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

१. सन २००७ मध्ये मी शेगाव पोलीस स्टेशन येथे सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होतो. त्यावेळेस अपराध क्र.५३/२००७ भादवी कलम ४५४, ३८० या गुन्ह्याचा तपास मला प्राप्त झाला होता. तपासादरम्यान मी घटनास्थळ पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो नि.क्र.९ वर आहे. आरोपीची पोलीस कस्टडी घेतली व त्याच्या चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याप्रमाणे मेमोरंडम पंचनामा तयार केला. आता मला मेमोरंडम पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंचांची व साक्षीदाराची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यानुसार बाळापुर येथील विजयकुमार शहा दुकानातून जर्मनचा डब्बा व तांब्याचा लोटा जप्त केला होता. त्याला **नि.क्र.१४** देण्यात येते. तपासादरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आता मला आरोपीने भांडे विकल्याची व दुकानदाराने भांडे खरेदी केल्याची पावती दाखविण्यात आली. ती तिच आहे. ती नि.क्र.१२ वर आहे. सदरचा मुद्देमाल पावती तयार करुन हेडमोहररकडे जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्याला **नि.क्र.१५** देण्यात येते. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावे मिळून आल्यामुळे त्याच्या विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपीला मी ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास संपला.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.२३.०४.२०२६ | दि.२३.०४.२०२६ |